# DECCAN COLLEGE
Post-Graduate & Research Institute
Pune - 411 006, India

(Declared as Deemed to be University under Section 3 of U.G.C. Act, 1956)

"A" GRADE
REACCREDITED BY NAAC

# डेक्कन कॉलेज
पदव्युत्तर व संशोधन संस्था
पुणे - ४११ ००६, भारत

(विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या अधिनियमातील प्रभाग ३ नुसार अभिमत विद्यापीठ घोषित)


S. No. 2018 / 0449

Dept. of A.I.H.C. & Archaeology

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
-----------------------------------

संदर्भ: ७०१/पुरातत्त्व संग्रहालय/ ४५२
दि.२५-७-२०१८

DECCAN COLLEGE PUNE-6. DEEMED UNIVERSITY

**विषय : इतिहास व पुरातत्त्व विषयांसंबंधीची एक दिवसीय २५ वी कार्यशाळा, शुक्रवार दि.१०-८-२०१८**

**महोदय/महोदया,**

डेक्कन कॉलेज ही पुण्यातील ख्यातनाम संस्था आहे. या संस्थेतील पुरातत्त्व विभाग गेली ७६ वर्षे भारतीय संस्कृती, पुरातत्त्व व प्राचीन तसेच मध्ययुगीन इतिहास या विषयांमध्ये संशोधन करीत आहे. येथील उच्च दर्जाच्या शिक्षणामुळे पुरातत्त्व विभागाला प्रगत संशोधन केंद्र म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मान्यता मिळालेली आहे. संस्थेने महाराष्ट्रात तसेच भारतात अनेक ठिकाणी उत्खनने केलेली आहेत. भारतातील तसेच परदेशातील अनेक विद्यार्थी येथे एम.ए., एम.फिल. व पीएच.डी.करीत आहेत.

डेक्कन कॉलेज मध्ये पुरातत्त्व संग्रहालय व मराठा इतिहास संग्रहालय ही दोन संग्रहालये असून त्यांना पुण्यातील, महाराष्ट्रातील तसेच भारतातील अनेक शाळा, महाविद्यालये व संशोधन संस्था आवर्जून भेटी देऊन या विषयासंबंधी संस्थेतील तज्ञ लोकांकडून माहिती घेत असतात. सध्या पुरातत्त्व विषयासंबंधीचा अभ्यासक्रम इयत्ता ३ री, ६ वी व ९ वी तसेच १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या इतिहास विषयांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट केलेला आहे. पुरातत्त्व हा विषय पाठ्यपुस्तकांमध्ये नव्यानेच समाविष्ट केल्यामुळे इतिहास हा विषय शिकवणाऱ्या शिक्षकांना त्या विषयासंबंधी माहिती फार कमी प्रमाणात असते. त्यामुळे या विषयासंबंधीची शास्त्रीय माहिती, उत्खननाद्वारे नवीन उजेडात आलेली माहिती शिक्षक, महाविद्यालयीन विद्यार्थी व इतर इच्छुक लोकांना व्हावी यासाठी संस्थेतर्फे एक दिवसीय कार्यशाळा घेण्याचा उपक्रम गेली अनेक वर्षे सुरू आहे. या कार्यशाळेत शिक्षकांसाठी तज्ञ लोकांची व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच पुरातत्त्व विभागाच्या निरनिराळ्या प्रयोगशाळांना भेटी व संस्थेतील दोनही संग्रहालयांना भेटी आयोजित केल्या जातात. अशा प्रकारची कार्यशाळा आयोजित करण्यामागे हेतू असा आहे की पुरातत्त्व व इतिहास या विषयासंबंधीची नवीनतम व सखोल माहिती ही शिक्षकांना तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना (B.A./M.A./D.Ed./B.Ed./M.Ed.) व्हावी व ती त्यांनी प्रत्यक्षपणे वर्गात विद्यार्थ्यांना सांगावी. या कार्यशाळेत मिळालेल्या माहितीमुळे हा विषय विद्यार्थ्यांना वर्गात शिकवणेही सुलभ जाते असे दिसून आले आहे. तसेच संस्थेतील दोनही संग्रहालयांची माहिती शिक्षकांनी घेऊन दरवर्षी हा विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सहल-भेटी शाळेने आयोजित कराव्यात असाही हेतू यामागे आहे. अशा सहल-भेटी देणाऱ्या शाळांचे आम्ही जरूर स्वागतच करतो.

**यावर्षीची कार्यशाळा शुक्रवार, दि.१०-०८-२०१८ रोजी आयोजित केली आहे. या कार्यशाळेत भाग घेण्यासाठी प्रत्येक शिक्षक प्रतिनिधीकडून आणि इतरांकडून नाममात्र शुल्क रू.३००/- (रूपये तीनशे फक्त)आकारण्यात येईल. आपणास अशी विनंती आहे की आपल्या शाळेतील इतिहास, विज्ञान व कला या विषयासंबंधीच्या शिक्षकांना उपस्थित राहण्यासाठी सूचना करावी. संस्थेतर्फे शिक्षक प्रतिनिधींना भोजन व चहा दिला जाईल.**

दि.७-८-२०१८ पर्यंत या कार्यशाळेस उपस्थित राहू इच्छिणाऱ्या शिक्षक प्रतिनिधींची नांवे आम्हास कळवावी व आपला प्रवेश निश्चित करावा. डॉ. बालाजी गाजूल (९९२३७९४२५९), गिरीश मांडके (९८२३११६२६७) व निलम ढापरे (९४०५००८३६९), संग्रहालय कार्यालय ०२०-२६५१३२८८ यांच्याशी फोन किंवा ई-मेलने संपर्क साधावा.

Email: **museum@dcpune.ac.in** or Website: **www.dcpune.ac.in**

आपली,

(प्रा.डॉ.सुषमा देव)
विभाग प्रमुख,
प्रा.भा.इ.सं. व पुरातत्त्व विभाग, डेक्कन कॉलेज, पुणे

Head
Deptt. of Archaeology
DECCAN COLLEGE
Postgraduate & Research Institute
(Deemed to be a University)
Pune-411 006.


Telephones : Deccan College (EPABX Pilot Nos.) : 26513200, 26513207 Archaeology : 26513239, Linguistics : 26513248
Sanskrit & Lexicography : 26513232, Library : 26513211, Registrar : 26513204, Accounts Section : 26513208, Academic Section : 26513237
Fax : (020) 26513284 E-mail : dakshina@pn2.vsnl.net.in Web : www.dcpune.ac.in

## इतिहास व पुरातत्त्व विषयांची एक दिवसीय २५ वी कार्यशाळा

डेक्कन कॉलेज मधील पुरातत्त्व संग्रहालय व मराठा इतिहास संग्रहालयातर्फे शालेय शिक्षकांसाठी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी इतिहास व पुरातत्त्व विषयांसाठी एक दिवसीय २५ वी कार्यशाळा शुक्रवार दि.१० ऑगस्ट २०१८ रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्या कार्यशाळेचा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.

### कार्यक्रमाचा तपशिल

**स्थळ : पदवीप्रदान सभागृह, पुरातत्त्व विभाग, डेक्कन कॉलेज, येरवडा, पुणे - ४११ ००६**

दिनांक : १०-०८-२०१८, शुक्रवार

| | | |
|---|---|---|
| ०९.०० - १०.३० | : | कार्यशाळेस सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींची नोंदणी, परस्पर परिचय, |
| १०.३० - १०.३५ | : | कार्यशाळेचे उद्‌घाटन व संबंधीत व्याख्याने |
| १०.३५ - १०.५५ | : | कार्यशाळेचा उद्देश |
| ११.०५ - ११.४५ | : | डेक्कन कॉलेजचा इतिहास व पुरातत्त्वशास्त्राची ओळख |
| ११.४५ | : | चहापान |
| १२.०० - ०२.०० | : | पुरातत्त्व संग्रहालयास भेट<br>तांत्रिक विभागांना भेटी |
| ०२.०० - ०२.४० | : | भोजन (डेक्कन कॉलेज मेस) |
| ०२.४० - ०३.१० | : | मराठा इतिहास संग्रहालयास भेट |
| ०३.१० - ०३.३० | : | ग्रंथालयाला भेट |
| ०३.३५ - ०५.१५ | : | पुरातत्त्व विभागातील विविध प्रयोगशाळांना भेटी व चहापान |
| ०५.१५ - ०५.३० | : | समारोप (पदवीप्रदान सभागृह, पुरातत्त्व विभाग) |

**डॉ.बालाजी गाजूल**
**अभिरक्षक**
**पुरातत्त्व संग्रहालय**

**श्री.गिरीश मांडके**
**अभिरक्षक**
**मराठा इतिहास संग्रहालय**